Gomantak Times 26/9/04

# बड्या 'आयटी' कंपन्यांशी 'यूजीसी' करार करणार

## 'सकाळ' आयोजित कुलगुरू परिषदेत घोषणा

वार्का, ता. २५ : विद्यापीठांतील पायाभूत सुविधा, प्रशासन, विविध अभ्यासक्रम, परीक्षा, प्रवेशप्रक्रिया आदींसाठी माहिती तंत्रज्ञानाचा (आयटी) प्रभावी वापर करण्याबाबत विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे( यूजीसी) इंटेल, आयबीएम, सन मायक्रोसिस्टीम, मायक्रोसॉफ्ट या प्रमुख कंपन्यांशी लवकरच करार केला जाणार आहे.

या वर्षअखेरपर्यंत करार पूर्ण होणार असून पुढील शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी यूजीसीतर्फे सुमारे ५० कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. 'यूजीसी'चे अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर यांनी आज येथे ही माहिती दिली.

उच्च शिक्षण आणि माहिती तंत्रज्ञान उद्योगातील प्रमुख व्यक्ती आज 'सकाळ' ने आयोजित केलेल्या कुलगुरू परिषदेत एका व्यासपीठावर आल्या. यावेळी 'एज्युकॉन ०४' चर्चासत्र घेण्यात आले. केतन संपत, डॉ. अंजन घोष (इंटेल), ज्युडीथ एस्कॉट (आयबीएम), विजय आनंद (सनी मायक्रोसिस्टम) विजू जेकब आणि डॉ. रुडी (डायमेन्शन सायबरटेक) यांनी सर्व कुलगुरुंसमोर आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल सादरीकरण केले.

या सादरीकरणानंतर डॉ. निगवेकर म्हणाले, इंटेल, आयबीएमं, सन मायक्रोसिस्टम या कंपन्या शिक्षणक्षेत्राला पूरक ठरतील अशी अनेक उत्पादने विकसित करीत आहेत, तसेच त्या स्वतंत्रपणे काही विद्यापीठे आणि महाविद्यालयांबरोबर कार्य करीत आहेत. मात्र, त्यांचा संपर्क प्रामुख्याने आयआयटी किंवा आयआयएम सारख्या संस्थांशी होत आहे. त्यांचा आणि पारंपरिक विद्यापीठांचा संपर्क व्हावा, यासाठी 'यूजीसी' ने पुढाकार घेतला आहे. कारण देशातील बहुतेक विद्यार्थी या विद्यापीठांत शिकत आहेत. या सर्व कंपन्या वेगवेगळ्या विषयांशी निगडित असल्याने त्यांचा विद्यापीठांना लाभच होणार असल्याचे डॉ. निगवेकर यांनी नमूद केले.

UGC
Vice Chancellors Meet
intel. Presents
सकाळ वृत्तपत्र समूह

### 'इंटेल' तर्फे ७५ विद्यापीठांत सुविधा

इंटेल कंपनीने शैक्षणिक संस्थांसाठी बिनतारी प्रणाली (वायरलेस सिस्टिम) आणि 'युनिव्हर्सिटी प्रोग्रॅम मॉडेल' विकसित केले आहे. देशभरातील ७५ विद्यापीठांत ही प्रणाली बसविण्यात येणार असल्याचे संपत यांनी सांगितले. डॉ. घोष यांनी त्याची अधिक माहिती दिली,

ते म्हणाले, विद्यापीठात माहिती आणि दूरसंचार सुविधा वाढल्यास शिक्षणाचा दर्जाही वाढू शकतो, हे लक्षात घेऊन इंटेलने शैक्षणिक क्षेत्राशी संपर्क सुरू केला आहे. एकूण ८७ शिक्षण संस्थांत आतापर्यंत ई-कंटेंट, मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स, अभ्यासरचना आदींबद्दल कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. 'युनिव्हर्सिटी (पान ५ वर)

आणखी बातम्या पान ५ वर



वार्का येथे सुरू असलेल्या कुलगुरू परिषदेत बोलताना इंटेल इंडियाचे अध्यक्ष केतन संपत. शेजारी युजीसीचे अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर व व्यासपीठावर डॉ. अंजन घोष आणि ज्युडीथ एस्कॉट.